आरोग्य सेवा
==========
परिपत्रक
======

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/ १७२९८-१७३२८/९०,
उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय,
राज्य आरोग्य माहिती व जीवन विषयक आकडेवारी केंद्र,
कॅनॉट हाऊस, पहिला मजला, आयकर भवनामागे, पुणे -१.
दिनांक : १ जानेवारी, १९९१.

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी व
जिल्हा निबंधक जन्म मृत्यु,
जिल्हा परिषद - ________

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ व तदअंतर्गत महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, १९७६ मधील तरतुदीं बद्दलचे स्पष्टीकरण..

वरील अधिनियम व नियमावलीमधील कांही तरतुदीं बाबत व कांहींच्या बाबत अधिक माहितीची विचारणा जिल्हा निबंधक, गट विकास अधिकारी व निबंधक यांचे कडून होत असते. आता पर्यंत वेळोवेळी स्पष्टीकरणे सर्वसंबंधीतांना या पूर्वीच कळवीले आहेत. खालील कांही सर्वसाधारण मुद्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

मुद्दा :- कायदा कलम १३[३] व नियम १०[३] नुसार करण्यात येणारी उशीरा नोंदणी

स्पष्टीकरण [अ] जन्म मृत्यू नोंदणीस एक वर्षापेक्षा जास्तकाळ उशीर झाला असल्यास अशा उशीरा घटनांची नोंदणी सध्याच्या आदेशानुसार कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१/न्याय दंडाधिकारी वर्ग-१ यांच्या खास आदेशावरुन व विलंब शुल्क रु. ५ भरुन सध्या नोंदणी करता येते.

[ब] एका वर्षापेक्षा जास्त उशीरा म्हणजेच १९९० साली १९८८ पासून मागील कुठल्याही वर्षाची घटना उदा. १९१०, १९३५ अथवा १९५९ इत्यादी सालातील सुध्दा सदर उशीरा नोंदणीसाठी मागील घटनांची सत्यता पडताळून आदेश देण्याचा अधिकारी कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ / न्याय दंडाधिकारी वर्ग-१ यांना आहे. [महारजिस्ट्रार, भारत सरकार, गृहमंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १/१/१९८५ जिवनांक [समन्वय] दिनांक १०/९/१९८५]

[क] वरील प्रमाणे उशीरा नोंदणी करतांना निबंधकांनी ज्या महिन्यामध्ये आदेश झाला आहे त्या महिन्याच्या जन्म/मृत्यू रजिष्टर मध्ये नोंद घेतांना अशा उशीरा घटनांच्या नोंदीत अनुक्रमांक देऊ नये व त्या नांवासमोर "उशीरा नोंद" असे स्पष्टपणे लिहावे. जर अनुक्रमांक दिले गेले तर त्या महिन्यात ती घटना घडली नसतांनाही ती घडली आहे असे अनुक्रमांकावरुन दिसून येईल. या मुळे त्या गावाचा जन्म/मृत्यू दर वाढलेला दिसण्याची शक्यता आहे. शक्यतो उशीरा नोंदी ज्या त्या महिन्यात नोंद करण्यात आलेल्या घटनांच्या शेवटी लिहिण्यात याव्यात.

[ड] महाराष्ट्र राज्यातील उपविभागीय दंडाधिकारी [महसूल] हे वर्ग-१ चे अधिकारी आहेत पण त्यांना कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ याच पदांचे अथवा इतर कार्यकारी दंडाधिकारी यांनी आदेश देण्या बाबतचा मुद्दा राज्य व केंद्र शासनाच्या विचाराधीन असून या बाबत शासकीय आदेश प्राप्त होताच सर्व संबंधीतांना कळविण्यात येईल.

मुद्दा [२] :- कलम १५ व नियम ११ नुसार जन्म / मृत्यू नोंदणीमधील दुरुस्ता अथवा नोंदणी रद्द करणे.

स्पष्टीकरण - जन्म / मृत्यू रजिस्टर मधील कुठल्याही रकान्यांत भरलेली माहिती आडाखोड करून रद्द करू नये. ज्या ठिकाणी माहिती सुधारित स्वरुपांत द्यावयाची आहे त्या ठिकाणच्या माहितीस तांबडया शाईने गोल वर्तुळ करुन योग्य ती दुरुस्ती करावी अथवा रदद केल्याचे शेरा रकान्यांत लिहून निबंधकांनी सही करावी व तारीख लिहावे. चुकीच्या दुरुस्तीचे सर्व अधिकार केवळ जन्म मृत्यू निबंधकासच आहेत. न्याय दंडाधिकारी या बाबत आदेश देण्यास सक्षम प्राधिकारी नाहींत.

मुद्दा क्र.[३] कलम ३२ व नियम १९ नुसार जन्म मृत्यूची रजिष्टरे कोठे ठेवावीत.

स्पष्टीकरण [अ] जन्म मृत्यूची रजिस्टरे वैधानिक कायम स्वरुपाचे रेकार्ड असून ते परत परत लिहून ठेवता येत नाही. मूळ रजिस्टर कायम स्वरुपांत जतन करणे अत्यंत जरुर आहे.

[ब] ग्रामीण भागातील निबंधकानी सध्याच्या वर्षाच्या मागील दोन वर्षा पुर्वीचे रजिस्टर गट विकास अधिकारी यांचे कडे कायमचे रेकॉर्ड म्हणून जमा करावीत.

[क] तसेच जन्म मृत्यूच्या दाखला वरील प्रमाणे ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांनी जन्म/मृत्यू दाखला दिला पाहिजे.

मुद्दा क्र.[४] एखादा माणूस / स्त्री वाहून गेल्यास बेपत्ता झाल्यास अशा घटनांची नोंदणी.

स्पष्टीकरण - फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ नुसार एखादा माणूस/स्त्री चा किमान सात वर्षापर्यंत ठाव ठिकाण हाताला नसल्यास ती घडल्या पासून ७ वर्षांनी संबंधीत घर प्रमुख/पोलीस इ. च्या माहितीवर आधारीत मृत म्हणून [संबंधीत माणूस स्वतः हजर होई पर्यंत] नोंद करावी.

मुद्दा क्र.[५]: अनौरस अपत्य

स्पष्टीकरण :- अनौरस अपत्याची जन्म / मृत्यू नोंद करतांना जर आई आणि स्वतःला वडिल म्हणून घेणा-या व्यक्तिने दोघांच्या सम्मतीने आई वडिल म्हणून नांव नोंदविण्यास अनुमती दिली तर दोघांचे नांव नोंदवावे अथवा नैसर्गिक आईची सम्मती असल्यास तिचे नांव आईचे रकान्यात लिहावे.

स्पष्टीकरण : कायदा कलम ८ व ९ व नियम ५ नुसार नोंदणीसाठी माहिती घटना घडल्यापासून २१ दिवसाचे आंत दिली पाहिजे व माहिती मिळाल्यानंतर ताबडतोब जन्म / मृत्यू दाखला विनामुल्य दिले पाहिजे. [शासन सार्वजनिक आरोग्य क्र. बीडीएम/१०८९/५१६१/अधिसूचना सीआर-५९/कुक-३, दिनांक १८/१०/१९८९.]

मुद्दा क्र. ७ :- जातीचा उल्लेख

स्पष्टीकरण :- जन्म / मृत्यू रजिस्टरमध्ये फक्त धर्माबद्दल उल्लेख करण्याची तरतूद असून जातीचा उल्लेख करण्याची तरतूद नाही.

मुद्दा क्र. ८ :- नोंद नसल्याबाबतचा दाखला कलम १७ व नियम १४.

जन्म/मृत्यूची नोंद रजिस्टरला नसेल तर अशा वेळी विहीत नमुना क्रमांक १३ ब मध्ये शोध घेण्यात आला व नोंद नसल्या बाबतचा दाखला द्यावा व संबंधीत वर्षाचे रजिस्टर गहाळ, नष्ट अथवा वाहून गेले असतील तर नमुना क्र. १३ अ मध्ये नोंदवह्या सापडत नसल्याचा दाखला द्यावा.

मुद्दा क्र. ९ :- कायदा कलम १४ व नियम ११ नुसार नांव नोंदणी

जन्म रजिस्टरला जन्माच्या नांवाची नोंद घटना घडल्या पासून १५ वर्षाच्या आंत विनामुल्य करण्याची तरतूद असून त्या नंतरच्या प्रत्येक वर्षासाठी रु. २ विलंब शुल्क आकारून नांव नोंदणी करण्याची तरतूद आहे.

[सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. बीडीएम-१००३/१३८३/सीआर-१००, कुक-३, दिनांक २९/८/१९८५]

मुद्दा क्र. १० :- खून, बेवारशी प्रेत, बेवारस नवजात अर्भक यांची नोंदणी

अशा प्रकरणी पोलीस खात्या कडून योग्य ती माहिती घ्यावी व त्या आधारे जन्म/मृत्यू ची नोंदणी करावी व त्या आधारे जन्म/मृत्यूची नोंदणी करावी. रजिस्टर मधील एखाद्या रकान्यात भरावयाची माहिती उपलब्ध नसल्यास तसे शेरा रकान्यात लिहावे, मृत्यूचे कारण पोलीस स्टेशन कडून आल्यानंतर लिहावे.

मुद्दा क्र. ११ :- महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम, १९७६ ची सुधारित प्रत.

सदर मराठी व इंग्रजी मधील सुधारित प्रत छापण्यासाठी शासनाकडे सादर केले आहे. छापून आल्यानंतर त्याचे वितरण सर्व संबंधीतांना करण्यात येईल.

वरील प्रमाणे स्पष्टीकरण ग्रामीण भागातील ग्रामपंचायतच्या निबंधकांना वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे मार्फत, तसेच गटविकास अधिकारी व नगरपरिषद, कॅंटोनमेंट व महापालिका यांच्या निबंधकांना उपयोगी पडण्यासाठी त्यांचे नजरेस आणावी व त्याची प्रत या कार्यालयास द्यावी.

(स्वाक्षरी)
उपसंचालक आरोग्य सेवा
[आमाजीआर] व
उपमुख्य निबंधक-जन्म मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत सादर :- १) संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
२) सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई